पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे
दुरध्वनी क्रमांक ०२०-२६२०९१२२
ई मेल आयडी - cro.pcpc-mh@gov.in



जा.क्र.पोआ/पिंचिं/आस्था-२/पोलीस भरती-२०२४-२५/नियुक्ती आदेश/२०२६ 5031079 दि. २९/०७/२०२६

-: प्रसिध्दीपत्रक :-

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाचे रिक्त असलेल्या ४६२ पदांकरिता आवेदन अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची शारिरीक मोजमाप, मैदानी चाचणी व लेखी परिक्षा घेण्यात आलेली आहे. त्यात पात्र उमेदवारांची प्रचलित शासन निर्णय/परिपत्रक व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) २०११ व (सुधारणा) नियम २०१९ नुसार पोलीस भरती निवड समितीने ४६२ उमेदवारांची अंतिम निवडसूची (Final Selection List) व ५७९ उमेदवारांची अंतिम प्रतिक्षायादी (Final Waiting List) दिनांक १८/०४/२०२६ रोजी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे www.pcpc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे.

सदर पोलीस पोलीस शिपाई भरती प्रक्रिया दरम्यान लेखी परीक्षा व मैदानी चाचणी मध्ये प्राप्त गुण, सामाजिक व समांतर आरक्षणानूसार पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेल्या ४६२ उमेदवार यांचे पैकी वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणीमध्ये पात्र तसेच समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्रे वैध असलेबाबत अहवाल प्राप्त झालेले एकुण ४२३ उमेदवार यांना यापुर्वी दि.१३/०५/२०२६ दि.१८/०५/२०२६,दि.२२/०५/२०२६,दि.०५/०६/२०२६,१५/०६/२०२६ व दि.०६/०७/२०२५ रोजी नियुक्ती आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानंतर खालील नमुद १० उमेदवार हे वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणीमध्ये पात्र तसेच समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्रे वैध असल्याने ते पोलीस शिपाई पदावर नियुक्तीस पात्र ठरलेले आहेत. नमूद उमेदवारांना पोलीस शिपाई पदावर नियुक्ती आदेश घेणेकरिता व कर्तव्यावर हजर होणेकरिता **दिनांक ०१/०८/२०२६ रोजी सकाळी ०९.०० वा. पोलीस मुख्यालय, अंकुश बोऱ्हाडे हायस्कुल, निगडी प्राधिकरण, पुणे ४११ ०४४ पिंपरी चिंचवड येथे** हजर राहणेबाबत कळविण्यात येत आहे. तरी संबंधित उमदेवारांनी विहीत वेळेत नमुद ठिकाणी हजर राहणेबाबतची नोंद घ्यावी.

Sr.no	Chest Number	Name	Gender	Caste	Horizontal Reservation	selection
1	7675	Gajanan Madhavrao Ganage	Male	SC	SP	sc_sp
2	7630	Shivasharan Suresh Mane	Male	DTa	SP	vja_sp
3	7426	Yogesh Ramesh Narwate	Male	NTc	SP	ntc_sp
4	3418	Nagesh Rohidas Bawane	Male	OBC	PAP	obc_pap
5	7613	Prakash Dilip Malvadkar	Male	SEBC	SP	sebc_sp
6	7606	Dattatray Kalidas Tuljapure	Male	EWS	SP	ews_sp
7	7600	Taufik Rustum Shaikh	Male	EWS	SP	ews_sp
8	7592	Omkar Guruling Vibhute	Male	OBC	SP	open_sp
9	6490	Ashish Sanjay Sapkal	Male	SC	SP	sc_sp
10	7386	Pavan Mahadeo Mahale	Male	OBC	SP	obc_sp

उपरोक्त नमुद उमेदवार तसेच यापुर्वी नियुक्ती आदेश निर्गमित केलेले उमेदवारांचे सामाजिक व समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्रे पडताळणी अहवाल तसेच इतर आवश्यक कागदपत्रे पडताळणी अहवाल व चारित्र्य पडताळणी अहवालात भविष्यात प्रतिकुल बाबी निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल, याची संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

टीप :- उर्वरित उमेदवार यांचे वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी अहवाल तसेच समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्रे पडताळणी अहवाल प्राप्त झालेनंतर नियुक्ती आदेशाबाबत योग्य कार्यवाही करण्यात येईल. तसेच याबाबतची अदयावत माहिती संकेस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(गणेश इंगळे)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय
पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड